**महाराष्ट्र शासन**

संलेको २०१६ / प्र.क्र. २२९ /कोषा प्रशा २

वित्त विभाग,
मादामकामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दि. २.८.२०१७.

प्रति,

**१) श्री. म. वि. पवार २) श्री. ज. ल. वसावे**

विषय :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- अ (कनिष्ठ) सहाय्यक संचालक संवर्गात सन २०१५-२०१६ मध्ये पदोन्नतीने पदे भरण्यासाठी निवडसुची तयार करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- अ (कनिष्ठ) सहाय्यक संचालक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याकरीता सामान्य प्रशासन विभागाकडून १८ अधिकाऱ्यांच्या निवडसुचीस मान्यता प्राप्त झाली आहे. सदर १८ अधिकाऱ्यांपैकी ९ अधिकाऱ्यांचे महसुली विभागासाठी पसंतीक्रम दि. ३१/७/२०१७ च्या पत्रान्वये मागविण्यात आले आहेत. आपले प्रकरणी शासन स्तरावर जाणीवपुर्वक निर्णय घेवून, आपणास सहायक संचालक संवर्गात पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. त्याअनुषंगाने सहायक संचालक संवर्गातील पदोन्नतीने पदस्थापनेकरीता शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही- २०१५/ प्र.क्र. १५६/ का- १२, दि. २८/४२०१५ व दि. १६/७/२०१५ तसेच दि. १५/६/२०१७ अन्वये करण्यात आलेली दुसरी सुधारणा यामधील तरतुदी विचारात घेवून, आपला महसुली विभागाकरीताचा पसंतीक्रम ७ दिवसांचे आत आवश्यक त्या कागदपत्रासह शासनास सादर करावा. विहित मुदतीत विकल्प प्राप्त न झाल्यास नियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. विकल्प मागविण्याचा विहित नमूना सोबत जोडला आहे.

३. सदरचे पत्र व विकल्प मागविण्याचा विहित नमूना www.mahakosh.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याकरीता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प shubhangi.sheth@nic.in / ad.admin@mahakosh.in या ईल-मेल वर किंव प्रत्यक्ष कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यासनात सादर करावेत.

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक संचालक संवर्गातील रिक्त पदांची महसुली विभागनिहाय स्थिर्त पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) नागपूर- | | ०९ |
| २) अमरावती- | | ०५ |
| ३) औरंगाबाद- | | ०८ |
| ४) कोकण | कोकण (i)- | ०० |
| | कोकण (ii)- | ४० |
| ५) नाशिक- | | ०४ |
| ६) पुणे- | | ०१ |

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रत :- संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

***(सदरचे पत्र व विकल्पाचा मसुदा आजच www.mahakosh.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही संचालनालयाने करावी.)***